# 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ' आणि जपानमधील 'ओसाका सिटी एन्व्हायरमेंट ब्युरो' यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार – १२ जानेवरी, २०२६

'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ' आणि जपानमधील 'ओसाका सिटी एन्व्हायरमेंट ब्युरो' यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. सिद्धेश जी कदम, मंडळाचे सदस्य सचिव श्री. एम. देवेंदर जी सिंह (भा.प्र.से.) आणि मुंबईतील जपानचे कॉन्सुलेट जनरल श्री. कोजी यागी-सान जी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार संपन्न झाला.

या करारामुळे घनकचरा व्यवस्थापन, जल प्रदूषण आणि वायू प्रदूषण नियंत्रण यांसारख्या गंभीर समस्यांवर उपाय शोधण्यासाठी जपानच्या तंत्रज्ञानाचा आणि अनुभवाचा महाराष्ट्राला मोठा फायदा होणार आहे. प्रगत तांत्रिक देवाणघेवाण करून राज्याला अधिक स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करणे, हे या मैत्रीपूर्ण सहकार्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

याप्रसंगी श्री. शुनसुके कावाबे (मॅनेजर, पर्यावरण ब्युरो, ओसाका सिटी गव्हर्नमेंट, जपान), सुश्री अकीको डोई (वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी, आंतरराष्ट्रीय सहकार्य विभाग, ग्लोबल एन्व्हायर्नमेंट सेंटर, जपान), श्री. तोमोया मोटोडा (वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी, आंतरराष्ट्रीय सहकार्य विभाग, ग्लोबल एन्व्हायर्नमेंट सेंटर, जपान), तसेच सुश्री. नाकाजिमा नाओ, सुश्री. चिका काटाओका, श्री. शुनिची होंडा, श्री. अंशुमन बासू आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


Background


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
महाराष्ट्र


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
महाराष्ट्र


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
महाराष्ट्र


महाराष्ट्र
Maharashtra Pollution


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ


महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
महाराष्ट्र